जनवाचन आंदोलन
बालपुस्तकमाला

आवडणार नाही का तुम्हाला
पुस्तकांचं बोलणं ऐकायला?

पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय
पुस्तकांमध्ये चिमण्या चिवचिवतात
पुस्तकांमध्ये हिरवी शेतं डुलतात
पुस्तकांत झऱ्यांचं पाणी गुणगुणतं
अन् पऱ्यांच्या कथा कुजबुजतात
पुस्तकांत अग्निबाणाचं रहस्य असतं
पुस्तकांत विज्ञान बोलत असतं
पुस्तकांचं जग केवढंतरी मोठं आहे
पुस्तकांमध्ये ज्ञानाची लयलूट आहे

आवडणार नाही का तुम्हाला
त्या जगात भटकायला?
पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय


-सफदर हाश्मी

मूल्य रु. ६.००

भारत
ज्ञान विज्ञान
समुदाय

सादाको आणि हजार बगळे

लेखक एलीनेर कोयर
हिन्दी अनुवाद अरविंद गुप्ता
मराठी अनुवाद वंदना साबळे



भारत
ज्ञान विज्ञान
समुदाय

पुस्तकाचे नाव : सादाको आणि हजार बगळे
लेखक : एलीनॉर कोयर
हिन्दी अनुवाद : अरविंद गुप्ता
मराठी अनुवाद : वंदना साबळे
संपादन : विनया देशपांडे
चित्रकार : अविनाश देशपांडे
निर्मिती सहाय्यः दिनानाथ मनोहर

जवाआं ५३/ बाल - ७
प्रकाशन : जून २००१

मूल्य : ६ रुपये

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ,
पुणे-४११०३०. फोन : ०२०-४४५६६९४
मुद्रणस्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे-४११००४.

अक्षर जुळणी : गणेश कांबळे

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समितीतर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित.

या प्रकाशनांचा उद्देश लोकांमध्ये आणि मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणं हा आहे.

सादाको आणि हजार बगळे

सादाको आज पहाटेच जागी झाली होती. तिची बहीण आणि भाऊ मात्र अजूनही झोपलेलेच होते. आपल्या भावाला मासाहीरोला जोरजोरात हाका मारत ती उठवू लागली, "अरे किती वेळ झोपणार, आज शांतता दिन आहे हे लक्षात आहे ना तुमच्या?" सादाकोची लहान बहीण मित्सुई आणि छोटा भाऊ ईजा दोघेही जागे झाले.



अंथरूण काढून, झाडलोट करून सादाको आईजवळ येवून म्हणाली, ''आई लवकर नाष्टा दे. आज मला यात्रेला जायचे आहे.''

भात आणि सूप बनविण्यासाठी आई भाज्या चिरत होती. सादाकोला थोडी रागे भरत ती म्हणाली, ''तू आता अकरा वर्षाची झालीस. तुला आता थोडं कळायला हवं. दरवर्षी आपण सहा ऑगस्ट हा दिवस स्मृतिदिन म्हणून साजरा करतो, कारण याच दिवशी हिरोशिमा शहरावर ॲटम बॉम्ब टाकल्याने शेकडो-हजारो लोक मेले होते. या दिवसाची आठवण ठेवलीच पाहिजे.''

सादाकोचे वडील सझाकी म्हणाले, ''आजच्या दिवशी त्या अशुभ, भयंकर बॉम्बस्फोटामुळे तुमची आजी देवाघरी गेली. हा खरंच अत्यंत वाईट, काळाकुट्ट दिवस आहे.''

त्यानंतर सगळे कुटुंब प्रार्थनेसाठी एका टेबलाभोवती जमा झाले. टेबलावर आजीचा फोटो एका सोन्याच्या फ्रेममध्ये लावून ठेवला होता. सझाकींनी आपल्या सर्व पूर्वजांच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी प्रार्थना केली. तसेच ॲटम बॉम्बमुळे होणाऱ्या कॅन्सरसारख्या वाईट आजारापासून सुरक्षित राहण्यासाठी देखील प्रार्थना केली.

हिरोशिमा शहरावर ॲटम बॉम्बचा स्फोट झाला, त्याला आता नऊ वर्षे उलटून गेली होती. परंतु त्या स्फोटातून जी विषारी किरणं व धूर बाहेर पडला त्यामुळं आजही कित्येक लोक भयंकर आजाराला बळी पडत होते. असह्य वेदना सहन करत मरत होते.

शांती दिन

घरातले सगळे लोक बाहेर पडले तेव्हा रस्त्यावर खूप गर्दी झाली होती. सादाकोही आपल्या प्रिय मैत्रिणीसोबत, चुजूकोबरोबर हातात हात घेवून धावत होती. दोघी जीवलग मैत्रिणी होत्या. पहिल्या इयत्तेपासून एकाच वर्गात शिकत होत्या.



सादाको म्हणाली, ''जरा भरभर जाऊ या म्हणजे आपल्याला यात्रेत खूप काही पाहता येईल.''

आई दरवाज्यात उभी राहून मागून सांगत होती. ''सावकाश जा गं, ऊन खूप वाढलं आहे.'' पण आईचं सांगणं त्या उत्साही मुलींच्या कानावर पडलंच नाही. त्या रस्त्यावरून वेगाने धावत होत्या.

'शांती पार्क'च्या इमारतीसमोर लोक गंभीरपणे, शांत उभे होते.



भिंतीवर ॲटम बॉम्बने उध्वस्त झालेल्या शहराचे व मेलेल्या लोकांचे फोटो चिटकवले होते. त्या ॲटमबॉम्बने सुंदर, ऐटदार हिरोशिमा शहर वाळवंटासारखं उजाड होऊन गेलं होतं.

''मला ॲटम बॉम्बचा तो भयंकर स्फोट अजून आठवतोय'' सादाको चुजूकोला सांगू लागली,'' त्यावेळी असं वाटलं, जणू करोडो सूर्य एकाच वेळी चमकू लागले आहेत.''

''पण तुला हे आठवणं कसं शक्य आहे !'' चुजूको म्हणाली. ''त्यावेळी तर तू फक्त दोनच वर्षांची होतीस.''

''मला आठवतंय,'' सादाको ठामपणे म्हणाली.

बौद्ध भिक्षूंची प्रार्थना झाली. आणि शेकडो कबूतरांना मोकळ्या आकाशात स्वैर उडण्यासाठी पिंजऱ्यातून मुक्त केलं गेलं.

यात्रेत अनेक प्रकारच्या खाऊंनी दुकानं गजबजली होती. त्यांच्या स्वादिष्ट व खमंग वासांनी भूक चाळवत होती. पण सादाकोला त्या वातावरणात असेही लोक दिसले ज्यांचे चेहरे पांढऱ्या डागांनी कुरूप झाले होते. ॲटम बॉम्बच्या भयंकर गर्मीनं त्यांचे चेहरे एवढे भाजले होते की, ते माणसाचे चेहरे वाटत नव्हते. असा कुणी माणूस सादाकोजवळ आला की ती तिथून दुसरीकडे निघून जाई.

दिवस मावळल्यावर आकाशात रोषणाईची करामत दाखवली गेली. त्यानंतर सगळी माणसं कागदापासून बनवलेले कंदील घेवून नदीकडे चालू लागले.

प्रत्येक कागदी कंदिलाच्या आत एक मेणबत्ती पेटवली होती. कंदीलावर मृत व्यक्तिचे नाव लिहिले होते. सादाकोनं आपल्या कंदीलावर आपल्या स्वर्गवासी आजीचं नाव लिहिलं. मग ते कंदील नदीच्या वाहत्या प्रवाहात सोडले गेले. कंदीलांचे ते काफिले अंधारात काजव्यांसारखे चमचमत होते.

लपलेली वेदना

पानगळीचे दिवस नुकतेच कुठे सुरू झाले होते. एक दिवस सादाको शाळेतून उत्साहानं धावत धावतच आली आणि आईला म्हणाली, ''आई आज तर कमालच झाली बघ. मी माझ्या वर्गातर्फे रिले रेससाठी निवडले गेले आहे.''

हवेतल्या हवेत आपलं दप्तर फेकून झेलत आनंदी सादाको



म्हणाली, "जर मी यात जिंकले तर पुढल्या वर्षी ज्युनियर हायस्कूलच्या टीममध्ये माझं नांव नक्कीच असेल शाळेच्या स्पर्धेला जाणाऱ्या संघात तिची निवड व्हावी ही तिची एकमेव इच्छा होती.

त्या दिवसानंतर सादाको प्रत्येक क्षणी केवळ आपल्या धावण्याच्या स्पर्धेविषयीच विचार करीत असायची. शाळेत रोज धावायचा सराव करायची. शाळेतून येतानाही ती धावत धावतच यायची. एक दिवस मासाहीरोनं आपल्या वडिलांच्या घड्याळात तिच्या धावण्याची गती मोजली. सादाकोची वेगवान गती पाहून सर्व लोक आश्चर्यात पडले. असं वाटत होतं, जणू ती वाऱ्याच्या वेगानंच धावते आहे.

शेवटी स्पर्धेचा दिवस उगवला. मुलांचे आई-वडील, नातलग,

मित्रमंडळी खेळ पहायला मैदानात गोळा झाले. सादाको थोडीफार घाबरलेली होती. ऐन पळण्याच्या वेळी आपली पावलं उचलणार नाहीत की काय असं तिला वाटत होतं. दुसऱ्या संघातील खेळाडू आपल्या संघापेक्षा अधिक ताकदवान व उंच दिसत होते.



आईनं सादाकोला धीर देत सांगितलं, "अगं स्पर्धा सुरू होण्यापूर्वी अशी भीती वाटणं स्वाभाविकच आहे. पण तू काळजी करू नको. तू मैदानात जाताच बघ कशी वाऱ्याच्या वेगाने धावशील."

आपल्या आईचे प्रेमळ व धीराचे बोल ऐकून सादाकोचा उत्साह पुन्हा जागा झाला. धीर आला. आणि तिची हिम्मत एकदम वाढली.

रिलेच्या स्पर्धा सुरू झाल्याची शिटी वाजली. सादाकोचे सर्व लक्ष केवळ रिले रेसवर केंद्रित झालं होतं. बाकी सर्व जग ती जणू विसरून गेली होती. जेव्हा तिची पाळी आली तेव्हा सादाको आपले प्राण एकवटून व सर्व शक्ती पणाला लावून धावली. रेस संपण्याच्या वेळी तिचे हृदय जोरजोराने धडधडत होतं.

त्यावेळी सादाकोच्या डोक्यात एकदम चक्कर आल्यासारखं वाटलं. तिची मैत्रीण ओरडली, ''सादाको तुमची टीम जिंकली बरं का.'' तरीही तिला ते काहीही समजलं नाही. दोन तीन वेळा डोकं झटकलं तेव्हा चक्कर थोडी कमी झाली.

संपूर्ण हिवाळाभर ती आपला धावण्याचा वेग वाढवण्याचा सराव करत राहिली. शाळेतल्या संघात निवड होण्यासाठी रोजचा सराव आवश्यकच होता. कित्येक वेळा या धावण्याच्या दरम्यान तिचे डोके गरगरू लागे. पण याबाबत तिनं आपल्या घरच्यांना काहीही सांगितलं नाही. तिच्या मनात भीती होती. पण तिनं आपल्या जीवलग मैत्रिणीलाही हे सांगितलं नाही.

एक दिवस तिची आई म्हणाली, ''सादाको, तुझ्याएवढ्या मुलीनं आता किमोनो (जपानी महिलांचा पारंपारिक पोषाख) घालायला हवा. माझ्याजवळ आता पैसे साठले की मी तुला एक

किमोनो घेऊन देईन.''

आई किमोनो घेऊन देणार म्हणून तिने आईला धन्यवाद दिले. पण मनापासून तिला किमोनोची आवड नव्हतीच. तिचं सारं लक्ष आता स्पर्धेकडे लागलं होतं.

जीवघेणी वेदना

असेच काही आठवडे गेले. सर्व काही ठीक चालू राहिलं. पण फेब्रुवारी महिन्याच्या थंडीत एक दिवस भल्या सकाळी सादाको शाळेच्या मैदानात धावण्याचा सराव करीत होती. तेव्हा अचानक तिला जोराची चक्कर आली. ती जमिनीवर पडली. तिच्या बाईंनी पटकन जाऊन तिला उचललं.

''मला वाटतंय की मी खूप दमले आहे,'' सादाको क्षीण आवाजात म्हणाली. जेव्हा तिनं थोडं उभं राहण्याचा प्रयत्न केला तेव्हा ती पुन्हा पडली.

तिच्या वडिलांना बोलावलं गेलं. ते सादाकोला रेडक्रॉसच्या दवाखान्यात घेवून गेले. दवाखान्यात जाताच तिचं मन भयभीत झालं. हॉस्पिटलचा एक विभाग खास करून ॲटम बॉम्बमध्ये आजारी पडलेल्या रोग्यांसाठी होता.

काही मिनिटांतच सादाकोच्या छातीचा एक्सरे घेतला गेला. आणि रक्ताचीही तपासणी केली गेली. डॉ.नुमाटा यांनी तिची तपासणी केली आणि तिला काही प्रश्न विचारले.



तोपर्यंत सादाकोच्या घरातले सर्वजण हॉस्पिटलला पोहोचले होते. आई कापऱ्या आवाजात म्हणत होती, "ल्यूकेमिया, म्हणजे रक्ताचा कॅन्सर ! पण हे तर अशक्य आहे."

सादाको ती भयंकर बातमी ऐकून हादरून गेली. आपल्या दोन्ही कानांवर हात ठेवून तिनं डोळे मिटून घेतले.

थोड्या वेळाने नर्स तिला हॉस्पिटलच्या एका खोलीत घेवून गेली. नर्सने सादाकोला एक सूती किमोनो घालायला दिला.

पलंगावर ती झोपलीच होती, तेवढ्यात सगळेजण तिला भेटायला आले.

सादाकोला आपल्या मिठीत घेत आई म्हणाली, "तुला इथे काही दिवस रहावे लागेल. पण रोज रात्री मी तुला भेटायला येत जाईन."

मासाहिरो, मित्सुई आणि इजी यांनी रोज शाळेनंतर तिला भेटायला यायचे वचन दिले.

"मला खरंच अॅटम बॉम्बचा रोग लागलाय?" सादाको वडिलांना विचारू लागली.

सझाकींच्या डोळ्यात अपार चिंता भरून राहिली होती. ते एवढंच म्हणाले, "डॉक्टरांना तुझ्या काही तपासण्या करायच्या आहेत. बस एवढंच. यासाठी तुला हॉस्पिटलमध्ये काही आठवडे राहावे लागेल."

"काही आठवडे?" सादाकोला आठवडे वर्षाप्रमाणं लांबलचक वाटले. ती आता शाळेच्या स्पर्धेत भाग कशी घेऊ शकणार? मनावर संयम ठेवून तिनं न रडण्याचा खूप प्रयत्न केला.

सादाकोला आता वेगळीच भीती वाटू लागली. तिला माहीत होतं, एकदा लोक हॉस्पिटलमध्ये दाखल झाले की पुन्हा कधीही आपल्या घरी जात नाहीत. त्या रात्री ती कित्येक तास रडत राहिली. एवढं एकटेपण तिला कधीच जाणवलं नव्हतं.

सोनेरी बगळा

दुसऱ्या दिवशी सादाको थोडी उशीराच उठली. नर्स तिला इंजेक्शन देता देता म्हणाली, "हॉस्पिटलमध्ये रोजच इंजेक्शन दिले जाईल. लवकरच तुला याची सवय होईल."

त्या दिवशी दुपारी तिची आवडती मैत्रीण चुजूको तिला भेटायला आली. आपल्या दोन्ही हातांनी पाठीमागे काहीतरी लपवत व हसत ती आली होती. सादाकोला ती म्हणाली, "जरा तुझे डोळे बंद कर बघू. मी तुझ्यासाठी एक गंमत आणली आहे."



सादाकोने आपले डोळे गच्च मिटले. जरा वेळानं तिनं डोळे उघडले तर तिच्यासमोर रंगीबेरंगी कागद आणि एक कात्री ठेवली होती. "हे काय?" ते सामान पाहून सादाको विचारू लागली. चुजूकी स्वतःवरच खूष होती. ती म्हणाली, "तुझी प्रकृती ठीक

करण्यासाठी मी एक युक्ति शोधून काढली आहे."

चुजुकोने त्यातल्या सोनेरी कागदाचा चौकोन कापला आणि त्याच्या घड्या घालून एक सुंदर बगळा बनवला.

सादाकोला काही समजेना. तिने विचारले, "पण हा कागदाचा बगळा मला कसा काय बरा करणार?"

"अगं तुला सारस पक्ष्याची जुनी गोष्ट माहीत नाही का?" चुजूकीनं विचारलं, "सारस पक्षी एक हजार वर्षापर्यंत जिवंत राहतात. आणि कुणी आजारी माणसानं एक हजार सारस पक्षी बनवले तर देव त्याला बरा करतो." ती सादाकोच्या हातात कागदाचा तो बगळा देता देता म्हणाली, "हा घे तुझा पहिला पक्षी."

सादाकोच्या डोळ्यात टचकन पाणी आलं. तिने चुजूकीचे मनापासून आभार मानले.

चौकोनी कागद दुमडून त्यापासून बगळा तयार करणं सुरूवातीला खूप अवघड वाटलं. दिसायला सोपा वाटणारा बगळा बनवणं एवढं सरळ नव्हतं. पण चुजूकीच्या मदतीनं तिला ते काम जमलं. खूप मेहनत घेवून तिनं दहा बगळे तयार केले. आणि ते सगळे बगळे सोनेरी पक्ष्याच्या ओळीत सजवून टाकले. काही बगळे अगदीच वेडे वाकडे झाले होते. पण ही तर केवळ सुरूवात होती!

"आता मला नऊशे नव्वद बगळे अजून बनवायचे आहेत," सादाको म्हणाली. त्या सोनेरी बगळ्यांमुळं तिला स्वत:ला खूप सुरक्षित वाटत होतं. काही आठवड्यातच तिला वाटलं की ती एक हजार बगळे बनवू शकेल. मग तिची तब्येत ठणठणीत होईल आणि ती आरामात घरी जाऊ शकेल.

मासाहीरो शाळेतून आल्यावर सादाकोला भेटायला आला तेव्हा टेबलावर गर्दी करणारे बगळे बघून म्हणाला, "हे टेबल तर लहान आहे. त्यावर एवढ्या बगळ्यांना जागा पुरत नाही म्हणून मी या पक्ष्यांना छताला लटकावून टाकतो." सादाको खूप खूष होती. ती सारखी हसत होती.

"तू मला वचन दे की मी जेवढे पक्षी बनवेन ते सगळे तू छताला टांगून देशील," सादाको म्हणाली.

मासाहीरोनं तिला तसं वचन दिलं. "मग तुला आता एक हजार कागदाचे पक्षी धाग्याने लटकवण्याचे काम करावे लागेल," सादाको म्हणाली. तिच्या डोळ्यात आता आशेची चमक होती.

"एक हजार!" मासाहीरो आश्चर्यानं म्हणाला, "तू चेष्टा तर करत नाहीस?"

त्याने नर्सकडून दोरा आणि चिकटपट्टी मागवून घेतली आणि ते दहाही पक्षी छताला लटकावून टाकले. तो सोनेरी पक्षी मात्र सादाकोच्या टेबलावरच राहू दिला.



सायंकाळी आईसोबत मित्सुई आणि ईजी सादाकोला भेटायला आले. कागदाचे ते पक्षी बघून प्रत्येकजण चकीत होत होता. आईला सगळ्यात लहान हिरवा बगळा सर्वात जास्त आवडला. तिनं सांगितलं की लहान कागद दुमडणं तर फार अवघड असतं.

सगळे लोक जेव्हा घरी गेले तेव्हा सादाकोच्या त्या खोलीत पुन्हा भयंकर एकाकीपणा जाणवू लागला. त्या उदास वातावरणातून बाहेर येण्यासाठी सादाको पुन्हा कागदाचे बगळे बनवू लागली.

अकरा.... मी लवकरच ठीक होऊन जाईन!

बारा.... मी लवकरच ठीक होऊन जाईन!!

केनजी

कागदाचे ते बगळे एक शुभ्र पवित्र प्रतिक होते. तिच्या

परिचयातील सर्वजण सादाकोच्या बगळ्यांसाठी कागद जमा करू लागले. चुजूकीनं आपल्या शाळेतून काही रंगीत कागद मागून आणले. वडील आपल्या केस कापायच्या दुकानात कागदाचे तुकडे सांभाळून ठेवत. नर्ससुद्धा औषधांच्या पाकीटांचे कागद सादाकोसाठी सांभाळून ठेवत असे. आणि मासाहीरो आपल्या दिलेल्या वचनानुसार प्रत्येक पक्षी छताशी छानपैकी लोंबता ठेवून देत असे. कधी कधी तो अनेक बगळे एकाच दोऱ्याशी लटकवून देई. काही मोठे पक्षी मात्र स्वतंत्र एकटे बांधले जात.

पुढील काही महिने असे गेले की सादाको एकदम ठणठणीत झाली आहेसे वाटले. तरीही डॉक्टर नुमाटा यांच्या मते तिचं हॉस्पिटलमध्ये राहणंच उचित होतं. आतापर्यंत सादाकोला हे माहीत झालं होतं की, तिला ल्यूकेमिया अर्थात रक्ताचा कॅन्सर झाला आहे. पण तिला हेही ठाऊक होतं की काही रोगी या आजारातूनही बरे होतात. तिनं बरं होण्याची आशा सोडली नव्हती.आपण एक दिवस पूर्ण बरे होऊ याची तिला खात्री होती.

जेव्हा तिला बरे वाटत असे तेव्हा ती वेगवेगळ्या कामात गुंतलेली असे. ती शाळेचा अभ्यास करीत असे, मित्रमैत्रिणींना पत्र लिहित असे. आणि भेटायला आलेल्यांशी गप्पा गोष्टी, कोडी, गाणी, खेळ अशाप्रकारे मजेत वेळ घालवी. सायंकाळच्या वेळी ती चौकोनी कागद दुमडून त्याचे पक्षी बनवत असे. आत्तापर्यंत तिनं तीनशे पक्ष्यांचे थवे बनवले होते. आता पक्षी बनवण्यात तिचा हात चांगलाच बसला होता. सराईतपणे तिची बोटं पटापट


दुमड घालीत असत. आता सगळे पक्षी सुंदर तर बनतच, पण ते सजीवही वाटत होते.

परंतु त्या भयंकर विषारी ॲटम बॉम्बचा आजार सादाकोच्या शरिरात पसरत गेला. तिला वेदनांची जाणीव होऊ लागली. तिचं डोकं कधी कधी एवढं दुखत असे की ती काही वाचू-लिहू शकत नसे. कधी तिला असं वाटे, जणू तिच्या हाडात आग भडकली आहे आणि ती वितळत चालली आहे. अशा मरणप्राय यातनांच्या वेळी तिच्या डोळ्यासमोर अंधारी येई. या अत्यंत अशक्त अवस्थेत ती काहीही करू शकत नसे. खिडकीबाहेर दिसणारी झाडं न्याहाळत पडून राहणं हाच तिचा विरंगुळा राहिला होता. तासन्तास ती तो सोनेरी पक्षी आपल्या मांडीवर ठेवून बसून राही.

एकदा असंच सादाको खूप अशक्त अवस्थेत होती. तेव्हा नर्सनं तिला चाकाच्या खुर्चीत बसवून व्हरांड्यात आणलं. तिथं थोडं ऊन होतं. तिथं पहिल्यांदाच सादाकोची भेट केनजीशी झाली. केनजी नऊ वर्षांचा होता, पण तो आपल्या वयापेक्षा खूपच लहान वाटत होता. सादाको त्याचा बारीक, सुकलेला चेहरा आणि चमकणारे काळे डोळे टक लावून बघत राहिली.

"हॅलो !" ती म्हणाली, "माझं नांव सादाको."

केनजीने खूप क्षीण आवाजात उत्तर दिलं. काही वेळातच ते दोघं खूप वर्षांची ओळख असलेल्या मित्रांप्रमाणं गप्पागोष्टी करू



लागले. केनजीला दवाखान्यात भरती होऊन बराच काळ लोटला होता. पण त्याला भेटायला खूप कमी लोक येत. त्याचे आई-वडील वारले होते आणि जवळच्याच एका शहरात तो आपल्या आजीसोबत रहात होता.

केनजी सादाकोला सांगत होता, ''माझी आजी खूप म्हातारी झाली असल्याने ती आठवड्यातून एकदाच मला भेटायला येते. त्यामुळं मी जास्तीत जास्त वेळ फक्त वाचनातच घालवतो.''

सादाको केनजीच्या उदास चेहऱ्याकडे बघत राहिली.

''पण आता काही मला फरक पडणार नाही,'' आपलं बोलणं पुढं चालू ठेवत केनजी म्हणाला, ''कारण मी लवकरच मरून जाईन. ॲटम बॉम्बमुळे मला रक्ताचा कॅन्सर झाला आहे.''

''पण तुला ल्युकेमिया होऊच शकत नाही,'' सादाको म्हणाली, ''जेव्हा ॲटम बॉम्बचा स्फोट केला गेला तेव्हा तू जन्मालाही आला नव्हतास.''

''त्यानं काही फरक पडत नाही. या आजाराचं विष माझ्या आईच्या शरीरात पोहोचलं होतं ना!'' केनजी म्हणाला.

सादाकोनं केनजीचं सांत्वन करायचा प्रयत्न केला. तिनं केनजीला सोनेरी पक्ष्याविषयीही सांगितलं.

''मला सोनेरी पक्ष्यांविषयी माहिती आहे,'' केनजी म्हणाला, ''पण आता खूप वेळ झाला आहे. आता मला देवही वाचवू शकत नाही.''

केनजीसाठी काय करावं या विचारात ती बुडून गेली. तिनं सर्वात चांगल्या व रंगीत कागदाचे काही पक्षी बनवले. आणि ते केनजीसाठी पाठवून दिले. 'बहुतेक माझे पक्षी त्याचं दुःख दूर करू शकतील,' तिनं विचार केला. नंतर सादाको आपल्यासाठी कागदाचे काही बगळे करू लागली.

तीनशे एकोणऐंशी.... तीनशे नव्वद.... एक दिवस केनजी व्हरांड्यांत दिसेना. नर्सनं येवून सादाकोला सांगितलं की काल

रात्री केनजी गेला. सादाकोला हे दुःख सहन झालं नाही. भिंतीकडे तोंड करून ती हमसून हमसून रडली. तिचं रडणं थांबलं तेव्हा रात्र होऊन गेली होती. आकाशातल्या चमकणाऱ्या चांदण्यांकडे बघून ती म्हणाली, ''केनजी या असंख्य ताऱ्यांपैकी एका ताऱ्यात जाऊन बसला असेल काय ?''

''तो जिथं असेल तिथं माझ्या मते आता खूष असेल,'' नर्स म्हणाली. ''त्यानं आपलं आजारानं थकलेलं शरीर त्यागलं. त्याचा आत्मा आता मुक्त झाला आहे.''



सादाको हवेत थरथरणाऱ्या झाडांच्या पानांचे आवाज ऐकत होती. मग तिनं विचारलं, ''आता यानंतर मीच मरणार, होय ना?''

''नाही,'' नर्स नकारार्थी हात हलवत म्हणाली. पलंगावर रंगीत कागद पसरत नर्स म्हणाली, ''सादाको झोपण्यापूर्वी मला

कागदाचा एक पक्षी करून दाखव. जेव्हा तुझे एक हजार पक्षी होतील तेव्हा तू एकदम ठीक होऊन जाशील. आणि मग म्हातारी होईपर्यंत छान जगशील.''

नर्सच्या या म्हणण्यावर विश्वास ठेवणं सादाकोला जड जात होतं. पण ती पुन्हा पक्षी बनवण्यात गर्क झाली. आणि आपल्या तब्येतीसाठी प्रार्थना करू लागली.

चारशे त्रेसष्ठ...चारशे चौसष्ठ....

शेकडो शुभेच्छांचा वर्षाव

जून महिना बरोबर पाऊस घेऊन आला. दिवसभर पावसाचे थेंब खिडकीच्या काचेवर आपटत रहात.

सादाकोचा चेहरा आता पिवळसर पडला होता. आता हॉस्पिटलमध्ये फक्त तिचे आई-वडील आणि मोठ्या भावालाच यायची परवानगी होती. तिच्या वर्गातील सर्व मुलामुलींनी मिळून तिच्यासाठी एक लाकडाची बाहुली पाठवली होती. ती बाहुली सादाकोनं सोनेरी पक्षाजवळ टेबलावर ठेवली होती.

आईची चिंता वाढली होती कारण सादाकोनं आता जेवणखाण खूप कमी केलं होतं. एक दिवस आईनं सादाकोची सगळ्यात आवडती मिठाई बनवली होती. पण ती केवळ एकच घास खाऊ शकली. तिचे जबडे सुजले होते. आणि तिला काहीच चावता येत नव्हतं.

सादाकोचं कुटुंब खूप गरीब होतं. खूप कष्ट करून मिळवलेल्या पैशातूनं ते तिच्यासाठी चांगलं, पौष्टिक अन्न देत. आणि ते ही सादाको खाऊ शकत नव्हती. या विचारानं तिच्या डोळ्यातून पाणी आलं.



आईनं आपल्या लेकीला काळजाशी घट्ट धरलं आणि म्हणाली, "तू काळजी करू नकोस. तू ठीक होणार आहेस. ज्या दिवशी सूर्यदर्शन होईल त्यादिवशी तुला चांगलं बरं वाटेल." नंतर आईनं तिला तिच्या शाळेतल्या पुस्तकातून काही कविता वाचून दाखवल्या.

मासाहीरो आला. त्यानं आपल्या खिशातून एक घडी घातलेला चांदीच्या रंगाचा कागद दिला. म्हणाला, "हा कागद ईजीने तुला यासाठी दिला आहे, की तू आणखी एक पक्षी तयार करावास."

सादाकोनं कागदाचा वास घेतला. त्याला चॉकलेटचा छान वास होता. "बहुतेक देवालाही चॉकलेटचा वास आवडेल!" सादाको म्हणाली. हे ऐकून तिघंहीजण खळखळून हसले. कितीतरी दिवसात आज प्रथमच सादाको हसली होती. हा एक शुभशकून होता. बहुतेक सोनेरी पक्ष्यानं आपली जादू आता सुरू केली होती. सादाकोनं चांदीच्या रंगाचा कागद सरळ केला व तो दुमडून एक बगळा तयार केला.

पाचशे एकतीस...

पण ती आता थकून दमून गेली होती. कागद दुमडण्याची शक्तीही तिच्यात उरली नव्हती. आई एक कविता गुणगुणू लागली. ही कविता ती सादाकोच्या लहानपणी तिला ऐकवत असे.

"स्वर्गातल्या सोनेरी पक्ष्यांनो,
माझ्या लाडकीला आपल्या
पंखांनी झाकून टाका..."

शेवटचे काही दिवस

जुलै महिना संपत आला होता. आता हवेत उष्मा होता आणि उन्हंही होती. सादाकोची प्रकृतीही जरा बरी वाटत होती. "मी हजारपैकी निम्म्यापेक्षा जास्त पक्षी बनवलेत. बहुतेक त्यामुळं काहीतरी शुभ घडेल." ती जवळ बसलेल्या मासाहीरोला म्हणाली.

आणि बरचसं तसंच घडलं. तिची भूक पुन्हा जागी झाली.

वेदना संपल्या. तिच्या या प्रगतीवर डॉ.नुमाटा खूष झाले आणि तिला एकदा तिच्या घरी फेरफटका मारून येण्याची परवानगी दिली. घरी जाण्याच्या कल्पनेनं सादाको एवढी खूष झाली की त्या रात्री तिला झोपच आली नाही. त्यामुळं संपूर्ण रात्र ती पक्षी बनवत राहिली.

सहाशे वीस...सहाशे एकवीस....


आपल्या घरी येऊन घरातल्या सर्व सदस्यांसोबत राहिल्याने तिच्या आनंदाला उधाण आले. आईनं आणि मित्सुईनं तिच्या स्वागतासाठी घासून घासून घर स्वच्छ केलं होतं.

सादाकोचा सोनेरी पक्षी आणि लाकडी बाहुलीही त्यांनी हॉस्पिटलमधून घरी आणली होती. गोडाधोडाच्या पदार्थांनी संपूर्ण घरात घमघम वास सुटला होता. सादाको खूष होती आणि बहुतेक ती आता घरीच राहणार होती. हॉस्पिटलमध्ये आता जावं लागणार नव्हतं.

कितीतरी दिवस सझाकी परिवाराचे सगळे नातेवाईक आणि मित्रमंडळी सादाकोला येवून भेटत राहिले. पण एका आठवड्यातच सादाकोच्या चेहऱ्यावर पुन्हा थकवा दिसू लागला. ती आता केवळ गुपचूप बसून रहात असे. आणि येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांकडे फक्त बघत बसत असे.

सादाकोची अशी अशक्त, दुर्बल अवस्था बघून सगळेजण दुःखी होते. आईच्या डोळ्यांसमोर वेगानं धावणाऱ्या आपल्या

लाडक्या चंचल सादाकोची आठवण तरळून जात असे.



दुसऱ्याच दिवशी सादाकोला हॉस्पिटलमध्ये परतावं लागलं. पहिल्यांदाच ती हॉस्पिटलच्या शांत, एकांत असलेल्या खोलीत खूष होती. तिचे आई-वडील खूप वेळ तिच्याजवळ बसून राहिले. सादाको झोपेतच काहीतरी बडबडत होती.

आईला काही समजेना. तिनं सादाकोचे हात आपल्या हातात धरून ठेवले.

वडील म्हणाले, "सादाको आता तुला थोडेच पक्षी बनवावे लागतील आणि मग तू एकदम बरी होशील."

तेवढ्यात नर्स आली. तिनं सादाकोला औषध प्यायला दिलं. डोळे बंद करण्यापूर्वी सादाको सोनेरी पक्षी उचलून म्हणाली, "एक दिवस मी ठीक होऊन जाईन पूर्ण, आणि मग वाऱ्याच्या वेगानं धावेन."

त्या दिवसानंतर जवळ जवळ प्रत्येक दिवशी डॉक्टर नुमाटा सादाकोला रक्त चढवत. "मला माहीत आहे तुला त्रास होतोय," ते म्हणत, "पण आम्हाला आपला सगळे प्रयत्न करायला हवेत."

सादाको होकारार्थी मान हलवत असे. आपल्या वेदना ती कधीही व्यक्त करीत नसे. बहुतेक खूप खोलवर एक भीती तिच्या आत उपजू लागली होती. ती भीती होती मृत्यूची ! आजारासोबतच तिला या मरणाच्या भीतीशीही लढा द्यायचा होता. या संघर्षात तिचा सहाय्यक सोनेरी पक्षी होताच. तो सादाकोची उमेद कायम जागी ठेवत होता !

आई जास्तीतजास्त वेळ आता हॉस्पिटलमध्येच थांबत असे. तिच्या चेहऱ्यावरील गाढ चिंता बघून सादाकोचे काळीज आतल्याआत जळत असे.

झाडांची पानं आता रंग बदलू लागली होती. आता सादाकोचे सर्व कुटुंबीये तिला शेवटचे भेटायला आले होते. इजीने सादाकोला एक डबा दिला. तो सोनेरी कागदात बांधून वर लाल रिबिनीने

बांधला होता. सादाकोनं हळूहळू डबा उघडला. डब्याच्या आत सादाकोसाठी एक सुंदर भेटवस्तू होती, रेशमी किमानो! त्याच्यावर चेरीच्या फुलांचे भरतकाम केले होते. आईनं किती प्रेमानं तो बनवला होता. किमोनो पाहून सादाको रडू लागली.

"तू का बनवलास हा ?" ती मऊ रेशमी किमोनोवर हात फिरवत म्हणाली. "मी हा कधी घालू शकणार नाही. आणि रेशीम किती महाग आहे."

"सादाको, तुझ्या आईनं काल संपूर्ण रात्र जागून हा किमोनो पूर्ण केला आहे. आपल्या आईसाठी एकदा तो घाल." वडील म्हणाले. खूप प्रयत्नानंतर सादाको पलंगावरून उठू शकली. आईच्या मदतीनं तिनं किमोनो घातला. सादाको यासाठी खूष होती की तिचे सुजलेले पाय किमोनोत लपून गेले होते. सादाको एक एक पाऊल हळूहळू टाकीत पुढे चालली. आणि खिडकीजवळच्या खुर्चीत जाऊन बसली. सगळे म्हणत होते की रेशमी किमोनोमध्ये सादाको एकदम राजकुमारीसारखी दिसते.

त्याचवेळी चुजूको तिथे येवून पोहोचली. डॉक्टर नुमाटांनी तिला थोडाच वेळ भेटण्याची परवानगी दिली. चुजूको आश्चर्यानं सादाकोला बघत राहिली. मग म्हणाली, "स्कूल ड्रेसपेक्षा तू या किमोनोत कितीतरी सुंदर दिसतेस."

यावर सर्वजण हसले. सादाकोही हसली.

"मग मी बरी झाल्यावर दररोज हाच किमोनो घालून शाळेत



जाईन.'' सादाकोनं गंमत केली.

मित्सुई व ईजी हे ऐकून खळखळून हसले.

काही वेळा तर असं वाटलं जणू घरचं जुनं खेळीमेळीचं वातावरण परतून आलं आहे. त्यांनी गाण्याच्या भेंड्यांचा खेळ खेळला आणि सादाकोच्या आवडीची गाणी गायली.

या दरम्यान सादाको खुर्चीवर गुपचूप बसून राहिली. ती आपलं

दुःख व त्रास मनात दाबून ठेवून होती. बहुतेक ते योग्यच होतं. घरी जाताना आई-वडिलांच्या चेहऱ्यावर खुशी होती.

झोपण्यापूर्वी सादाको केवळ आणखी एकच पक्षी बनवू शकली.

सहाशे चव्वेचाळीस ...

सादाकोनं बनवलेला हा शेवटचा बगळा होता.

वाऱ्याशी शर्यत

सादाको जसजशी अशक्त होत गेली तसतशी मृत्यूविषयी खूप खोलात जाऊन विचार करू लागली. ती स्वर्गात जाऊन उंच डोंगरावर राहील का? मृत्यूच्यावेळी खूप त्रास होत असेल का? की मृत्यू म्हणजे एक दीर्घकाळाची झोप आहे? मृत्यूला विसरण्याचा सादाकोनं खूप प्रयत्न करून बघितला. पण ती त्यात यशस्वी झाली नाही. तिच्या सर्व प्रयत्नानंतरही मरणाचे विचार तिच्या मनात घोळतच राहिले.

ऑक्टोबरच्या मध्यावर तर तिची अशी अवस्था झाली की तिला रात्र आणि दिवस याची काहीच जाणीव होत नव्हती. एक दिवस जेव्हा ती जागी झाली तेव्हा आई तिच्याजवळ बसून रडत आहे असे तिला दिसले.

''आई रडू नकोस,'' सादाकोनं विनवणी केली ''कृपा करून रडू नकोस.'' सादाको आणखीनही काहीतरी बोलू इच्छित होती

पण तिची जीभ आणि तोंड चालेनासं झालं. बंदच झालं. तिच्या डोळ्यातून एक अश्रू टपकन घरंगळला. तिनं आपल्या आईला किती दुःख दिलं होतं ! सादाको आता काहीही करू शकत नव्हती. केवळ कागदाचे पक्षी बनवणे व कोणत्यातरी दैवी चमत्काराची वाट पहाणे हेच तिच्या हाती होते. तिनं एक कागद उचलला पण तिची अशक्त बोटं कागद मुडपू शकली नाहीत. 'आता तर मी कागदाचे पक्षीही बनवू शकत नाही.' ती स्वतःशीच म्हणाली. पुन्हा एकदा तिनं पूर्ण शक्ती लावून कागद दुमडण्याचा प्रयत्न केला पण त्याचवेळी तिच्या डोळ्यासमोर अंधार पसरला!

काही मिनिटांतच डॉक्टर नुमाटा तिला पहायला आले. त्यांनी तिच्या डोक्यावर हात ठेवला. हळूच तिच्या हातातला कागद बाजूला करत म्हणाले, "तू आता आराम कर. हा पक्षी तू उद्या बनव."

मूर्च्छा येत चाललेल्या अवस्थेत सादाको हो म्हणाली. उद्या..? उद्या तिच्यासाठी खूप खूप लांब होता.

दुसऱ्या दिवशी सादाकोनं डोळे उघडले तेव्हा घरातले सगळेजण तिच्याजवळ होते. सादाको त्यांच्याकडे बघून हसू लागली. ती कायमची त्यांच्या ह्दयात राहणार होती याचा तिला विश्वास होता.

असं वाटत होतं जणू प्रकाशकिरणं तिच्या डोळ्यासमोर नाचत आहेत. सादाकोनं आपला अशक्त हात सोनेरी पक्षी धरण्यासाठी



पुढे केला. तिची जीवनशक्ती हळूहळू संपत चालली होती. पण सोनेरी पक्षी अजूनही तिच्यात वारे भरतच होता.

तिनं छताशी लोंबकळणारे बगळे पाहिले. तेवढ्यात शिशीरऋतूतील हवेच्या झुळूका आल्या आणि सगळे बगळे हवेत स्वैर उडू लागले. असं वाटू लागलं, जणू ते सर्व पक्षी जिवंत आहेत व खिडकीबाहेरच्या निळ्या आकाशाकडे पंख पसरून उडू लागले आहेत. ते पक्षी किती सुंदर व मुक्त होते. सादाकोनं एक दीर्घ श्वास घेतला. तिला उचकी लागल्यासारखे झाले. तिने आपले डोळे मिटून घेतले. त्यानंतर ती पुन्हा कधीच उठली नाही.

---ooo---

सादाकोचा मृत्यू २५ ऑक्टोबर १९५५ रोजी झाला.

सादाकोचे दफन १००० बगळ्यांसह करता यावे म्हणून तिच्या वर्गातील सर्वांनी मिळून उरलेले ३५६ कागदाचे बगळे बनवले. सादाकोच्या स्मृतिसाठी आणि अणुबाँबच्या परिणामी मरणाऱ्या मुलांची आठवण म्हणून एक स्मारक बनवण्याचा विचार सादाकोच्या मित्रांनी केला. साऱ्या देशातील मुलांनी त्यांना यासाठी मदत केली. १९५८ मध्ये हे स्मारक तयार झाले. हिरोशिमाच्या शांती-पार्क मध्ये हे स्मारक आहे. या स्मारकात सादाको एका सोनेरी पर्वतावर उभी आहे आणि तिच्या दोन्ही हातांनी एक पक्षी उचलून धरला आहे.

दरवर्षी शांती-दिनाला मुले सादाकोच्या स्मारकावर कागदी पक्ष्यांच्या माळा वाहतात. सादाकोच्या स्मारकाखाली लिहिले आहे:

आमचे आसू
हीच प्रार्थना करत आहेत-
जगात शांती नांदो!